Exh.13

# नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.

# यांचे कोर्टात...

**रे.मु.नं.**

**३६२/२०२५** **वादी**

दत्तात्रय नारायण कुऱ्हाट वगैरे

**प्रतिवादी**

भाऊसाहेब सिताराम झिने वगैरे

**या कामी प्रतिवादी नं.१ व २ कडून दाव्याची व मनाई अर्जाची कैफियत असे ती खालीलप्रमाणे.**

1) वादीचा दावा, मनाई अर्ज व त्यामधील कथने खरी नाहीत. सदरचे प्रतिवादींना मान्य नाहीत,कबुल नाहीत.

2) वादी हे स्वच्छ हाताने मे.कोर्टात आलेले नाहीत कारण वादी नं.2 हिचा या दावा मिळकतीशी कुठलाही काहीही एक हितसंबंध नसतांना खोटे कथनाचा आधार घेवुन बनावट दस्तऐवज तयार करुन वादी हे प्रतिवादी विरुध्द बेकायदेशीर मुदतीबाहेर गेलेल्या करारानुसार दावा मिळकतीचे खरेदीखत करुन मागत आहेत त्यामुळे सदर दाव्यास मुदतीचे कायद्याचा बाध येत आहे. तसेच मिस जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीज व नॉन जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीजचा बाध येत असल्याने या दोन्ही मुद्यांचे आधारे तात्काळ रद्द करण्यात यावा.

3) वादी नं.2 ही दावा मिळकतीच्या कोणत्याही दस्त ऐवजावर लिहून घेणार अगर जनरल मुख्त्यार म्हणुन अगर कोणत्याही तत्सम कागदपत्रे तयार करतांनी नव्हती व तिचा प्रत्यक्ष सहभाग नाही. या कारणामुळे मिस जॉईडर ऑफ

Order

---------------------------

Read & recorded.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.08.21 17:41:38 +0530

2nd Jt.CJJD Newasa

नेसेसरीज पार्टीजचा बाध येत आहे. त्यामुळे वादी नं.2 हिस या दाव्यातुन वादीपणातुन वगळण्यात यावे.

4) वादीच्या दाव्यास वादीने वाद मिळकतीमध्ये ज्या काही वाद मिळकती नमुद केलेल्या आहेत त्या वाद मिळकतींच्या चर्तु:सिमा दिलेल्या नसल्याने वादीच्या सदरच्या दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर 7 रुल 3 चा बाध येत आहे. कारण की दाव्यामध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे वर्णनावरुन दावा मिळकत निश्चित आयडेंटीफाय होत नसल्यामुळे वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही.

5) वादीचे दाव्यास सि.पी.सी. ऑर्डर 7 रुल 11 चा बाध येत असल्यानेही सदरचा दावा व मनाई हुकुमचा अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे.

6) वादीने दाखल केलेल्या दाव्यामधील संपूर्ण कथने ही वस्तुस्थितीची विर्पयास करणारी अशी असून मुलत: खोटी व बेकायदेशीर आहेत. सदरची सर्व कथने हे प्रतिवादी स्पष्टपणे नाकारीत आहेत. सदरची सर्व कथने वादीने इंडियन एव्हिडन्स ॲक्टचे तरतुदीप्रमाणे सक्तरितिने मे.कोर्टात शाबीत करावे.

7) वादीने सदरचा दावा दाखल करतांना या मे.कोर्टापासून सप्रेशन मटेरियल फॅक्ट्स केलेले आहे. याही कारणास्तव सदरचा दावा कायद्याने मेन्टेनेबल टेनेबल राहिलेला नाही म्हणून याही कारणास्तव सदरचा दावा समरली रद्द होण्यास पात्र आहे.

8) वादीने सदर दाव्याच्या चर्तु:सिमा चुकिच्या दिलेल्या असल्याने ऑर्डर 7 रुल 3 चा बाध येत आहे. याही कारणास्तव देखील वादीचा दावा खर्चासह रद्द होत आहे.

9) वादीचे दाव्यास मुदतीचे कायद्याचा बाध येत असल्याने देखील वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

10) वादी यांना कोणत्याही प्रकारची प्रायमाफेस केस नव्हती व नाही. तसेच न्यायाचा समतोल हा प्रतिवादीचे बाजूने कालही होता व आजही आहे. अश्या परिस्थिती मध्ये वादीस प्रतिवादी विरुध्द मनाई हुकुम मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त झालेला नव्हता व नाही व होणारही नाही. याही कारणास्तव सदरचा दावा व मनाई अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

11) वादींनी दावा कलम १ मध्ये जे मिळकतीचे वर्णन दिलेले आहे. ते खरे नाही कायदेशीर नाही त्यामुळे दावा मिळकत ही ॲडेन्टीफाय होवू शकत नाही. त्यामुळे वादीचा दावा व मनाई हुकुमाचे अर्जास सि.पी.सी. ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याकारणाने वादीचा दावा समरली रद्द होण्यास पात्र आहे.

12) वादींनी सदरच्या दाव्यात योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही व मिळकतीचे मुल्यांकन हे बेकायदेशीररित्या करुन प्रचलित कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार व योग्य त्या बाजारभावाप्रमाणे योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. याही कारणास्तव सदरचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. याच मुद्यावर प्रथम चौकशी होवून सदरचा दावा रद्द करण्यात यावा.

13) दावा कलम २ मधील कथन की, “ सदरची दावा मिळकत ही प्रतिवादी नं१. चे वडिल आणि प्रतिवादी नं२. चे पती सिताराम आसराजी झिने यांना शासना मार्फत कायमस्वरुपी देण्यात आलेली होती व आ हे. त्यासाठी सदर सिताराम आसराजी झिने यांनी सदर दावा मिळकतीची कब्जा हक्काची रक्कम १२१८/- रुपये तसेच मोजणी फी ३००/- रुपये शासनाकडे ता.०३/०९/२००२ रोजी भरलेली होती व आहे. त्यानंतर पुढे तशी कायदेशीर नोंद तहसिलदार नेवासा यांच्याकडे आदेश क्रं. एस/आर/४०/२००२ अन्वंये फेरफार नं. ९३४१ ने सदर दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर

कायदेशीररित्या करण्यात आलेली होती व आहे. आणि त्या अनुषंगाने पुढे सदर दाव्याच्या मिळकतीचा प्रत्यक्ष शासनाने सदर प्रतिवादी नं.१ चे वडिल आणि प्रतिवादी नं.२ चे पती सिताराम आसराजी झिने यांना त.१६/०१/२००३ रोजी दिलेला होता व आहे. याप्रमाणे दावा मिळकत ही सिताराम आसराजी झिने यांच्या कायदेशीर मालकी कब्जाची होती. ” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

14) दावा कलम ३ मधील कथन की, “ सदर प्रतिवादी नं.१ चे वडिल आणि प्रतिवादी नं.२ चे पती सिताराम आसराजी झिने हे ता.२१/०५/२००३ रोजी उस्थळ दुमाला (नविन चांदगांव) येथे मयत झाले. त्यानंतर पुढे सदर प्रतिवादी यांची मयत सिताराम आसराजी झिने यांचे हिंदू कायद्याप्रमाणे वारस म्हणुन नोंद रेव्हेन्यु रेकॉर्डला/महसुल दप्तरी फेरफार नं. ९४७४ ने झालेली होती व आहे आणि याप्रमाणे सदर दावा मिळकत ही वारस हक्काने प्रतिवादी नं.१ व २ यांच्या नावावर ७/१२ सदरी रेव्हेन्यु रेकॉर्डला कायदेशीररित्या झालेली होती व आहे.” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

15) दावा कलम ४ मधील कथन की, “ सदर प्रतिवादी आणि वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांचे अत्यंत प्रेमाचे, लोभाचे आणि घरोब्याचे आणि जिव्हाळयाचे संबंध होते व आहे. आणि वादीच्या वडिलांनी सदर प्रतिवादींना त्यांच्या सर्व कामात सहकार्य आणि मदत देखित केलेली होती व आहे. तसेच सदरची दावा मिळकत वादीच्या वडिलांना प्रतिवादी यांनी वहिवाटीस दिलेली होती व आहे. आणि याप्रमाणे दाव्याची जमिन ही वादीच्या वडिलांच्या ताब्यातच/कब्ज्यात होती व आहे. याप्रमाणे वादीच्या वडिलांचा आणि प्रतिवादींचा एकमेकांवर भरोसा आणि विश्वास होता व आहे. ” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

16) दावा कलम ५ मधील कथन की, “ याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे वस्तुस्थिती असतांना सदर प्रतिवादींना सदर दाव्याची मिळकत त्यांच्या वहिवाटीसाठी गैरसोयीची असल्यामुळे तसेच दाव्याच्या जमिनीतुन प्रतिवादींना हवे तसे उत्पन्न निघत नसल्यामुळे सदर जमिन प्रतिवादींनी कायमस्वरुपी विक्रीस काढली, आणि त्याबाबत सदर प्रतिवादींनी वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांना अशी विनंती केली की, आपले संबंध घरोब्याचे आहेत आणि आपला एकमेकांवर विश्वास आहे त्यामुळे सरची जमिन इतर लोकांना खरेदी देण्याऐवजी तुम्हीच खरेदीखत करुन घ्या आणि

त्यामुळे प्रतिवादींच्या विनंतीला मान देवुन वादीच्या वडिलांनी वादीच्या नावे सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करुन घेण्याचे प्रतिवादींच्या इच्छेप्रमाणे कबुल केलेले होते व अहे.” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

17) दावा कलम ६ मधील कथन की, “ त्यानंतर सदर दावा मिळकत ही शासनामार्फत मिळालेली असल्यामुळे सदर दावा मिळकतीचे ७/१२ सदरी इतर हक्कात पुनर्वसन नविन शर्त अशी नोंद देखील फेरफार नं. ९३४१ ने झालेली होती व आहे. त्यामुळे सदर दाव्याचे जमिनीच्या रजिस्टर खरेदीखतासाठी सक्षम महसुल अधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेणे आवश्य होते व आहे .आणि सदरची परवानगी आणण्यासाठी प्रतिवादीने वादीच्या मयत वडिलांना जनरल मुख्त्यारपत्र देखील ता.०६/१०/२००८ रोजी करुन दिलेले होते व आहे. आणि याप्रमाणे सदर दाव्याच्या मिळकती पुर्व परवानगी आणण्याची जबाबदार वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांना प्रतिवादींनी त्यांचे स्वईच्छेने दिलेली होती व आहे. सदरचे ता.०६/१०/२००८ चे जनरल मुख्त्यारपत्र वादी या दाव्यामध्ये या माननीय कोर्टाच्या अवलोकनासाठी दाव्यासोबत दाखल करीत आहे. सदरचे जनरल मुख्त्यारपत्र या दाव्याचा आणि मनाई हुकुमाच्या अर्जाचा पार्ट आणि पार्सल /अंग आणि भाग समजण्यात यावा आणि पुराव्यात वाचण्यात यावा अशी या वादीची या माननीय

कोर्टाला नम्रतेची विनंती आहे.” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

18) दावा कलम ७ मधील कथन की, “ याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे वस्तुस्थिती असतांना ता.०६/१०/२००८ सदर दावा मिळकत वादीला खरेदी देण्यासाठी सदर प्रतिवादी यांनी १००/- रुपयाच्या स्टॅम्पवर खरेदी करारनामा नोटरी श्री पी.एस.वाखुरे वकिल साहेब यांच्याकडे कायदेशीररित्या करुन दिलेला होता व आहे आणि त्यासाठी १००/- रुपयाचा स्टॅम्प प्रतिवादी नं.१ ने त्याच्या स्वत:च्या नावावर आणलेला होता व आहे. आणि त्याप्रमाणे प्रतिवादींनी सांगितल्याप्रमाणे सदरच्या १००/- रुपयाच्या स्टॅम्पवर प्रतिवादींनी वादीला दावा मिळकती बाबत खरेदी करारनामा त्यांच्या स्वइच्छेने करुन दिलेला होता व आहे. सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मधील संपूर्ण मजकूर प्रतिवादी यांनी सांगितल्याप्रमाणे टाईप करण्यात आलेला होता व आहे. आणि सदरचा मजकुर टाईप झाल्यानंतर सदरच्या खरेदी करारनाम्यावर वादी आणि प्रतिवादी नं.१ याने सदर नोटरी पब्लीक श्री पी.एस.वाखुरे यांच्या समक्ष सह्या केलेल्या होत्या आणि प्रतिवादी नं.२ हिने देखील नोटरी पब्लिक श्री पी.एस.वाखुरे वकिल यांच्या समक्ष सदर खरेदी करारनाम्यावर तीच्या स्वत:चा अंगठा केला होता आणि तसेच साक्षीदाराने देखील सदरच्या नोटरी खरेदी करारनाम्यावर त्यांच्या सह्या नोटरी पब्लिक यांच्या समक्ष केलेल्या होत्या व आहे. तसेच सदरच्या कायदेशीर

खरेदी करारनाम्यावर वादी आणि प्रतिवादी यांचे फोटो देखिल लावण्यात आलेले होते व आहे.” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

19) दावा कलम ८ मधील कथन की, “ सदरच्या ता.०६/१०/२००८ च्या नोटराईज खरेदी करारनाम्या मधील रिसायटल अन्वये दावा मिळकतीची खरेदी किंमत २,००,०००/- (दोन लाख रुपये मात्र) रुपये अशी ठरलेली होती व आहे. आणि सदरची दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/- वादीने प्रतिवादींना ता.०६/१०/२००८ रोजीच साक्षिदारांसमक्ष रोख दिलेले होते व आहे. तसेच सदरचे २,००,०००/- रुपये वादी नं.१ चे वडिल, भाऊ आणि वादी नं.१ यांच्या एकत्र अविभक्त हिंदू कुटुंबाच्या पैश्यातुन आणि उत्पन्नातुन त्यांच्या एकत्र हिंदू कुटुंबासाठी दिलेले होते व आहेत. आणि सदर दावा मिळकतीची रजिस्टर खरेदीखताची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/-रोख मिळाल्याबाबत प्रतिवादींनी सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये लिहून दिलेले होते व आहे. आणि तसे रिसायटल देखील सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या अन्वंये प्रतिवादींनी वादींच्या वडिलांना दिली होती आणि त्याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे प्रतिवादींनी वादींच्या वडिलांना सदर पुर्व परवानगी आणण्यासाठी स्वतंत्र नोटराईज जनरल मुख्त्यारपत्र देखिल करुन दिलेले होते व आहे. त्याबाबत देखिल सुस्पष्ट

रिसायटल सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये होते व आहे. एवढेच नव्हतेर सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये प्रतिवादींनी सदर दावा मिळकतीचे पुर्व परवानगी अणल्यानंतर वादीच्या वडिलांनीच दुय्यम निबंधक कार्यालय नेवासा येथे रजिस्टर खरेदीखत करुन द्यावे असे अधिकार देखिल सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये प्रतिवादींनी वादीच्या वडिलांना दिलेले होते व आहे. याप्रमाणे प्रतिवादी यांनी सदर वादीस ता.०६/१०/२००८ रोजी कायदेशीर नोटराईज खरेदी करारनामा करुन दिलेला होता व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

20) दावा कलम ९ मधील कथन की, " त्यानंतर पुढे सदर दावा मिळकतीचे सक्षम महसुल अधिकाऱ्यांकडुन परवागनी आणण्यासाठी प्रतिवादी यांनी लेखी अर्ज उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांच्याकडे दिला होता आणि त्या अर्जा अन्वंये प्रतिवादी यांनी वादी नं.२ (वादी नं.१ ची पत्नी) श्रीमती वनिता दत्तात्रय कुऱ्हाट हिला दावा मिळकत खरेदी देण्यासाठी सदर अर्जाअन्वंये रेव्हेन्यु अधिकारी साहेब यांना विनंती केलेली होती. त्यामुळे त्याबाबत संबंधीत रेव्हेन्यु अधिकाऱ्यांनी कायदेशीर चौकशी करुन सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्यासाठी कायदेशीर परमिशन ता.१३/०६/२०२४ रोजी दिलेली होती व आहे. आणि सदरच्या दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी सदर दावा

मिळकतीचे बागायत मुल्यांकन ८४,२६०/- (चौऱ्यांशी हजार दोनशे साठ रुपये फक्त) एवढी नजराणा रक्कम चलनाने शासनाकडे जमा करण्याबाबत हुकुम ता.१३/०६/२०२४ रोजी केलेला होता व आहे आणि सदर उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांनी ता.१३/०६/२०२४ रोजी सदर दाव्याच्या मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखतास जी परवानगी दिली आहे त्या पत्राची अस्सल प्रत वादी हे या दाव्यासोबत या माननीय कोर्टाच्या अवलोकनासाठी दाखल करीत आहे. सदर दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखतासाठी जी परवानगी देण्यात आलेली आहे त्या पत्राची आणि ऑर्डरची प्रत या दाव्याच्या आणि मनाई हुकुमाच्या अर्जाचा पार्ट आणि पार्सल/अंग आणि भाग समजण्यात यावे आणि पुराव्यात वाचण्यात यावे अशी या वादीची या माननीय कोर्टाला नम्रतेची विनंती आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

21) दावा कलम १० मधील कथन की, " सदर दाव्यातील वादी नं.२ हिच्या नावाने दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताच्या पुर्व परवानगीचा अर्ज प्रतिवादींनी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांच्याकडे दिलेला होता आणि वादी नं.२ हिच्या नावानेच सदर दावा मिळकतीच्या खरेदीखताचे पुर्व परवानगी देण्यात आलेली असल्यामुळे तीला या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन तसेच दाव्यामध्ये कोणताही तांत्रिक दोष राहु नये म्हणुन वादी नं.२ म्हणुन समाविष्ट केलेले आहे. आणि त्यामुळेच सदरचे सुस्पष्ट प्लिडिंग

वादींनी या दाव्यामध्ये ॲबंडंट प्रीकॉशनने केलेले आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

22) दावा कलम ११ मधील कथन की, " याप्रमाणे वरील संपूर्ण परिस्थिती असतांना आणि ता .१३/०६/२०२४ रोजी सदर दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी कायदेशीर पुर्व परवानगी मिळाल्यानंतर वादीने प्रतिवादींना स्वत: साक्षीदार सह प्रत्यक्ष भेटुन सदर दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास वारंवार विनंत्या केल्या, एवढेच नव्हेतर सदर दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताची चलनाने सदर दावा मिळकतीच्या बागायत मुल्यांकनाच्या ५०% रक्कम ८४,२६०/- रुपये वादी भरण्यास तयार होता व आहे. आणि ताबडतोब सदर रक्कम वादी चलनाने भरण्यास तयार आहे तरी तुम्ही दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन द्या अशी विनंती वादीने प्रतिवादी यांना प्रत्यक्ष भेटुन ०१/०१/२०२५ रोजी स्वत: साक्षिदारां समक्ष केली, परंतू प्रतिवादी यांनी देवुदिलावु करुन सदर दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास पध्दतशीरपणे टाळाटाळ केली आणि करीत आहे. त्यामुळे शेवटी नाईलाजास्तव वादीने प्रतिवादी नं.१ व २ यांना वादीच्या वकिला मार्फत कायदेशीर रजिस्टर नोटिस ता.२०/०१/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने दिली, सदरची नोटिस प्रतिवादींना ता.०४/०२/२०२५ रोजीच मिळालेली आहे, परंतू त्याबाबतच्या पोहोच पावत्या आज पर्यंत वादीला मिळु नये असे

प्रयत्न प्रतिवादींनी सुरु केल्याचे वादीला समजल्या बरोबर वादीने त्याबाबत ट्रॅक रिपोर्ट काढला आणि त्या ट्रक रिपोर्टवरुन हे स्पष्ट झाले की, सदर नोटिस प्रतिवादींना ता.०४/०२/२०२५ रोजी मिळालेली आहे. सदर ट्रॅक रिपोर्टची प्रत वादी या दाव्यासोबत दाखल करीत आहे. सदर ट्रॅक रिपोर्टची प्रत देखील या दाव्याचे आणि मनाई हुकुमाचे अर्जाचे पार्ट आणि पार्सल समजण्यात यावे आणि पुराव्यात वाचण्यात यावे अशी देखील या वादीची या माननिय कोर्टाला नम्रतेची विनंती आहे. सदर नोटिशीला प्रतिवादी यांनी मुद्दाम गैरसल्याने आणि गैरहेतुने उत्तर दिलेले नाही." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

23) दावा कलम १२ मधील कथन की, " याप्रमाणे वादीने प्रतिवादींना कायदेशीररित्या पाठविलेले रजिस्टर नोटिस मिळाल्यानंतर देखील प्रतिवादींनी वा ीदला दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन दिलेले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव वादींना प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

24) दावा कलम १३ मधील कथन की, " सदर वादींनी दावा मिळकतीची खरेदीची संपूर्ण रक्कम प्रतिवादींना खरेदी करारनाम्यावरच वर

वर्णन केल्याप्रमाणे ता.०६/१०/२००८ रोजी रोख दिलेले आहे. तसेच वादी हे दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन घेण्यास नेहमीच रेडी आणि विलींग (तयार होते व आहेत) होते व आहे. एवढेच नव्हेतर सदर दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी जे ५०% मुल्यांकन शासकीय ट्रेझरी मध्ये भरण्याची जबाबदारी प्रतिवादीची असतांना देखील आणि ती रक्कम रुपये ८४,२६०/- प्रतिवादी मुद्दाम शासकिय ट्रेझरी मध्ये भरत नाहीत असे असतांना देखिल सदरचे ८४२६०/- रुपये देखील वादी शासकिय ट्रेझरी मध्ये भरण्यास तयार आहेत. तरी देखिल प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास जाणीवपुर्वक आणि गैरसल्याने आणि गैरहेतुने आणि गैरउद्देशाने मुद्दाम टाळाटाळ करीत होते व आहे. त्यामुळे देखिल सदरचा दावा हा वादींनी त्वरीत दाखल केलेला आहे.” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

25) दावा कलम १४ मधील कथन की, “ सदर दाव्याच्या जमिनी मध्ये वादी हा गेल्या १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन स्वत: मालकी हक्काने कब्जा करुन पिके उत्पन्न उपभोग घेत होता व आहे. यावर्षी देखील वादीने सदर दाव्याच्या जमिनीमध्ये ४९६ जातीचे गव्हाचे पिक केलेले होते व आहे आणि सदरच्या गव्हाचे पीकाचे फळे वादींनी हार्वेस्टर मशिन मार्फत ता.२५/०३/२०२५ रोजी केलेले आहे आणि आता दावा मिळकत वादींनी नांगरुन मेहनत, मशागत करुन पुढील पिक घेण्यासाठी तयार केलेली आहेत. याप्रमाणे दावा

मिळकतीवर वादींचा कायदेशीर प्रत्यक्ष कब्जा होता व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

26) दावा कलम १५ मधील कथन की, " वादींना असे नुकतेच खात्रीलायकरित्या समजले आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकतीचे तिऱ्हाइत इसमांना बेकायदेशीर हस्तांतर करणार आहेत आणि निष्कारण मल्टीप्लीसीटी ऑफ लिटिगेशन आणि प्रोसेडिंग करणार आहे, त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द रजिस्टर खरेदीखत मिळण्यासाठी आणि हस्तांतराच्या मनाई हुकुम मिळण्यासाठी देखील सदरचा दावा वादींनी कोणतीही वेळ न घालविता वादी त्वरीत या माननीय कोर्टात दाखल करीत आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

27) दावा कलम १६ मधील कथन की, " वादींना उत्कृष्ट अशी प्रथमदर्शनी केस आहे, कारण दावा मिळकतीचे प्रतिवादीने वादी नं१ याला कायदेशीर नोटराईज खरेदी करारनामा करुन दिलेला आहे आणि दावा मिळकतीच्या खरेदीची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/- प्रतिवादींनी ता.०६/१०/२००८ रोजीच वादी कडुन साक्षीदारां समक्ष रोख घेतलेली आहे. तसेच न्यायाचा समतोल देखील वादीच्याच बाजुने होता व आहे. कारण दावा मिळकत वादींच्या प्रत्यक्ष

कब्ज्यात गेल्या १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन होती व आहे आणि त्यामध्ये वादी हे गहु, तुर वगैरे पिक घेत होते व आहेत. अश्या परिस्थिती मध्ये सदर प्रतिवादींना हस्तांतराचा मनाई हुकुम दिल्यास गेल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाहीत. परंतू प्रतिवादींना हस्तातराचा मनाई हुकुम न दिला गेल्यास सदर प्रतिवादी हे जाणीवपुर्वक मल्टीप्लीसीटी ऑफ लिटिगेशन आणि प्रोसेडिंग करतील आणि त्यामुळे वादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरमीत नुकसान होणार आहे, झाले आणि होत आहे ्र." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

28) दावा कलम १७ मध्ये दाखविलेले दाव्यास कारण ते खोटे व काल्पनिक असे दाखविलेले आहे दाव्यास कोणतेही रास्त कारण घडलेले नसतांनाही खोटे कारण देवून सदरचा दावा दाखल केलेला आहे. सबब वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही. दावा व मनाई हुकुमाचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

29) वादीने दावा कलम १९ मध्ये जो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला आहे. तो योग्य त्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे लावलेला नसल्याने कारणाने वादींचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

30) वादीचे दावा कलम २१ मधील वादीने ज्या विनंत्या या न्यायालयापासून मागितलेल्या आहेत त्या खोट्या अश्या आहेत सबब वादींच्या सर्व विनंत्या फेटाळून लावण्यात याव्यात हि विनंती अश्या प्रकारची मागणी वादीस करता येत नाही सबब वादीचा दावा रद्द करण्यात यावा.

31) वादीस सकृतदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल प्रतिवादीचे बाजूने आहे. मनाई दिल्यास प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही हे खरे नाही. व मनाई हुकुम न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. हे खरे नाही. मनाई न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याचे कारण नाही. वादीचा मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

32) **वस्तुस्थिती अशी आहे की,** सदर मिळकत ही प्रतिवादी नं.१ चे वडिलांना भुमिहिन शेत मजुर म्हणुन मिळालेली होती व आहे. प्रतिवादी नं.१ चे वडिल मयत झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ यांचे नांवे वारस म्हणुन सदर मिळकतीस लागलेली आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी हरजिनसी उत्पन्न उपभोग घेत होते व आहेत. वादी नं.१ चे वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी यांच्या लगत असलेल्या गट नंबर १८२ मधील इतर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी विकत घेण्याचे ठरविले व त्यांना दुसरी कडे सोईच्या अश्या जमिनी घेवुन देण्याचे ठरविल्याने सर्व लगतच्या शेतकऱ्यांनी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांचेवर विश्वास ठेवुन त्यांच्या जमिनी विक्री करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ व २ यांनी सुध्दा सदर दावा मिळकत ही नारायण कुऱ्हाट यांना विक्री करण्याचे ठरविले त्याप्रमाणे दि.६ ऑक्टोंबर २००८ रोजी वादी नं.१ चे लाभात नारायण कुऱ्हाट यांनी प्रतिवादी कडुन खरेदी करारनामा लिहून घेतला व त्याचदिवशी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी नं.१ व २ यांचेकडुन गट नंबर १८२/१ क्षेत्र ० हे ४४ आर आकार ० रु. २५ पैसे या मिळकती संदर्भात अदलाबदल करण्याकरीता जनरल मुख्त्यार लिहून घेतले. तद्नंतर नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी कुठल्याही प्रकारचे प्रतिवादी नं.१ व २ यांना अदलाबदल करण्याबाबत तसेच प्रतिवादी नं.१ व २ यांना दुसरे क्षेत्र दाखविले नाही अगर घेवुन दिलेले नाही.

33) प्रतिवादी नं.१ व २ यांनी वेळोवेळी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांची भेट घेवुन दिनांक ६ ऑक्टोंबर २००८ रोजी तुम्ही आमच्या कडुन बिन भरण्याचा खरेदी करारनामा दत्तात्रय नारायण कुऱ्हाट यांचे नावाने लिहून घेतलेला आहे. त्याबदल्यात आम्हाला तुम्ही दुसरीकडे सोईस्करअशी जमिन घेवुन देणार आहात ती जमिन आम्हास कधी  घेवुन देणार याबाबत विचारणा करण्यास गेले असता सध्या इतर शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यामुळे माझी आर्थिक अडचण आहे, तुम्ही आमच्या जवळचे आहात, माझ्यावर भरवसा ठेवा मी तुम्हाला फसविणार नाही असे बोलुन वेळकाढुपणा करत होते. परंतू नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी नं.१ व २ यांना प्रत्यक्ष ठरल्याप्रमाणे अदलाबदल करण्याच्या बदल्यात दुसरी जमिन आजतागायत बघितलेली नाही व देतही नाही. अश्या कारणामुळे प्रतिवादी नं.१ व २ यांची वादी नं.१ व त्यांचे वडिलांनी फसवणुक केलेली आहे.

34) सन २०२०-२०२१ च्या काळात नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट हे मयत झालेले आहेत ही बाब वादी यांनी लपवुन ठेवलेली आहे. यावरुन असे सिध्द होते की, वादी यांनी एकमिलाफी होवुन प्रतिवादीकडुन खोट्या कथनांचा आधार घेवुन व खोट्या नोटरी दस्त्ऐवजावरुन बेकायदेशीर खरेदीतखत करुन मिळण्याकामी प्रस्तृतचा दावा दाखल केलेला आहे. वादी नं.२ ही कोणत्या कागदपत्रांचे आधारे वादीपणात सामिल झाली याचा बोध होत नाही याही कारणास्तव वादीचे दाव्यास मिस जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीजचा बाध येत आहे. तसेच वादी यांनी खोट्या खरेदी करारनाम्याअन्वंये खरेदीखत करुन मागणी चालविलेली आहे त्यास मुदतीचे कायद्याची बाधा येत असल्याने सदर मुदतीच्या कायद्याचा प्राथमिक मुद्दा काढुन सदरचा दावा रद्द करण्यात यावा.

35) वादी यांनी प्रतिवादी यांना जी नोटिस पाठविलेली आहे. ती नोटिस खोटी व खोटा पुरावा निर्माण करण्याकरीता पाठविलेली आहे. त्याआधारे सदरच्या

तथाकथीत खोट्या करारनाम्याअन्वंये प्रतिवादींकडुन बेकायदेशीर खरेदीखत नोंदविण्याची मागणी चालविलेली आहे ती खोटी व लबाडीची आहेत कारण वादींनी प्रतिवादींना पाठविलेली प्रतिवादीकरीताची नोटिस ही मुदत संपल्यानंतर प्रतिवादींना भेटलेली आहे त्यामुळे प्रतिवादीविरुध्द वादींना कोणत्याही प्रकारचे नोटिसीद्वारे अगर कुठल्याही दिवाणी दाव्याची कारवाई होईल कल्पना नव्हती व नाही.

36) वास्तविक वादींनी प्रतिवादी यांना नेवासा सब रजि. ऑफिस मध्ये दिनांक ०३/०२/२०२५ रोजी हजर राहण्याबाबतची जी तथाकथीत खोटी नोटिस दिलेली होती ती नोटिस प्रतिवादींना दिनांक ४/२/२०२५ रोजी प्रतिवादींना मिळाली म्हणजे वादींनी प्रतिवादी यांना जाणीवपुर्वक हेतुपुरस्करपणे नोटिस मिळणार नाही मुदतीत ते तेथे येणार नाही या गैरउद्देशाने प्रेरीत होवुन स्वत:च्या फायद्याकरीता खोटे कथने करुन नोटिस पाठविली होती ही बाब वादींना माहिती होती व आहे. यावरुन असे सिध्द होते की, वादी यांनी प्रतिवादींना ठरल्याप्रमाणे अदलाबदल करण्याकरीता दुसरी सोईस्कर जमिन दिलेली नाही, देत नाही केवळ फुकटात प्रतिवादींची जमिन लाटण्यासाठी खोट्या मजकुराचा दावा प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे.

37) प्रतिवादी यांना वादीं नं.१ ने कोणताही मोबदला दिलेला नाही केवळ खरेदी करारनाम्याला दोन लाख रुपये दिल्याचे दाखविलेले आहे ते खोटे आहे. प्रतिवादी यांना कोणताही मोबदला मिळालेला नाही. कारण प्रतिवादी नं.१ चे वडिलांनी अदलाबदल करण्याकरीता सदरचे दस्तऐवज बनविलेला आहे त्यामुळे दस्ताआधारे वादीं नं.१ ला खरेदीखत करुन मागता येणार नाही. इतर लगत कब्जेधारकांच्या जमिनी घेवुन त्यांना इतर ठिकाणी जमिनी घेवुन दिलेल्या आहेत. केवळ प्रतिवादी यांना पर्यायी जमिन घेवुन दिलेली नाही. त्यामुळे वादी

यांचेशी झालेल्या करारनाम्याचा भंग झालेला असल्याने तो रद्द बातल झालेला आहे. त्यामुळे त्या बोगस खरेदी करारनाम्याचा आधार घेवुन वादींना या प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल करुन खरेदीखत करुन मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार राहिलेला नव्हता व नाही.

38) वादीचे दाव्यातील कथने बघितली असता तसेच दाव्यास दिलेले कारण बघितले असता वादी नं.१ ने स्वत: करारभंग केलेला दिसुन येतो. त्यामुळे वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही.

39) वरील सर्व कारणाचा विचार होऊन वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह रद्द व्हावा.

40) विनाकारण दावा करुन खर्चात पाडल्याने या प्रतिवादीं नं.१ व २ यांना वादीकडुन प्रत्येकी कॉम्पेंसेंटरी कॉस्ट रु. २०,०००/- व पिनल कॉस्ट रु. २०,०००/- देण्याचा हुकुम व्हावा. या दाव्याचा संपूर्ण खर्च वादीकडून देववावा.

41) **तरी प्रतिवादीची विनंती की,**

a. वादी यांचा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

b. इतर योग्य त्या न्यायाच्या दादी प्रतिवादी यांचे लाभात व्हावेत.

c. वेळप्रसंगी जादा कैफियत देण्याची व कैफियत दुरुस्त करण्याची परवानगी असावी.

**येणेप्रमाणे प्रतिवादी नं. १ व २ कडून दाव्याची व मनाई अर्जाची कैफियत असे.**

**नेवासा**

**दिनांक:-२१/०८/२०२५**

**प्रतिवादी नं.१**

**प्रतिवादी नं.२**

या कामी आम्ही प्रतिवादी नं.१ व २ सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतोत की, वर नमुद कैफियत मधील संपूर्ण मजकूर आमचे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यत्तेसाठी आज रोजी या लेखाखाली आम्ही आमच्या सह्या केल्या असे.

**नेवासा**

**दिनांक:-२१/०८/२०२५**

**प्रतिवादी नं.१**

**प्रतिवादी नं.२**

पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन सदर कैफियतीचा मसुदा तयार करुन दाखल केला असे.

**प्रतिवादी नं. १ व २ तर्फे ॲडव्होकेट**

**(ॲड.बी.जी.झावरे)**

Contents are Verified 1 to 41

Asstt. Supdt.

Assistant Superintendent

Criminal Court Newasa

Exh.14

## //ॲफिडेव्हिट//

## नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.

## यांचे कोर्टात...

रे.मु.नं.

३६२/२०२५

वादी

दत्तात्रय नारायण कुऱ्हाट वगैरे

प्रतिवादी

भाऊसाहेब सिताराम झिने वगैरे

**या कामी मी भाऊसाहेब सिताराम झिने वय-६०, धंदा-शेतमजुर रा.उस्थळ दुमाला ता.नेवासा जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

1) वादीचा दावा, मनाई अर्ज व त्यामधील कथने खरी नाहीत. सदरचे प्रतिवादींना मान्य नाहीत,कबुल नाहीत.

2) वादी हे स्वच्छ हाताने मे.कोर्टात आलेले नाहीत कारण वादी नं.2 हिचा या दावा मिळकतीशी कुठलाही काहीही एक हितसंबंध नसतांना खोटे कथनाचा आधार घेवुन बनावट दस्तऐवज तयार करुन वादी हे प्रतिवादी विरुध्द बेकायदेशीर मुदतीबाहेर गेलेल्या करारानुसार दावा मिळकतीचे खरेदीखत करुन मागत आहेत त्यामुळे सदर दाव्यास मुदतीचे कायद्याचा बाध येत आहे. तसेच मिस जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीज व नॉन जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीजचा बाध येत असल्याने या दोन्ही मुद्यांचे आधारे तात्काळ रद्द करण्यात यावा.

3) वादी नं.2 ही दावा मिळकतीच्या कोणत्याही दस्त ऐवजावर लिहून घेणार अगर जनरल मुख्त्यार म्हणुन अगर कोणत्याही तत्सम कागदपत्रे तयार करतांनी नव्हती व तिचा प्रत्यक्ष सहभाग नाही. या कारणामुळे मिस जॉईडर ऑफ

Order

---------------------------

Seen & filed

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2025.08.21 17:42:04 +0530

2nd Jt.CJJD Newasa

Criminal Court Newasa

नेसेसरीज पार्टीजचा बाध येत आहे. त्यामुळे वादी नं.2 हिस या दाव्यातुन वादीपणातुन वगळण्यात यावे.

4) वादीच्या दाव्यास वादीने वाद मिळकतीमध्ये ज्या काही वाद मिळकती नमुद केलेल्या आहेत त्या वाद मिळकतींच्या चर्तु:सिमा दिलेल्या नसल्याने वादीच्या सदरच्या दाव्यास सी.पी.सी. ऑर्डर 7 रुल 3 चा बाध येत आहे. कारण की दाव्यामध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे वर्णनावरुन दावा मिळकत निश्चित आयडेंटीफाय होत नसल्यामुळे वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही.

5) वादीचे दाव्यास सि.पी.सी. ऑर्डर 7 रुल 11 चा बाध येत असल्यानेही सदरचा दावा व मनाई हुकुमचा अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे.

6) वादीने दाखल केलेल्या दाव्यामधील संपूर्ण कथने ही वस्तुस्थितीची विर्पयास करणारी अशी असून मुलत: खोटी व बेकायदेशीर आहेत. सदरची सर्व कथने हे प्रतिवादी स्पष्टपणे नाकारीत आहेत. सदरची सर्व कथने वादीने इंडियन एव्हिडन्स अॅक्टचे तरतुदीप्रमाणे सक्तरितिने मे.कोर्टात शाबीत करावे.

7) वादीने सदरचा दावा दाखल करतांना या मे.कोर्टापासून सप्रेशन मटेरियल फॅक्ट्स केलेले आहे. याही कारणास्तव सदरचा दावा कायद्याने मेन्टेनेबल टेनेबल राहिलेला नाही म्हणून याही कारणास्तव सदरचा दावा समरली रद्द होण्यास पात्र आहे.

8) वादीने सदर दाव्याच्या चर्तु:सिमा चुकिच्या दिलेल्या असल्याने ऑर्डर 7 रुल 3 चा बाध येत आहे. याही कारणास्तव देखील वादीचा दावा खर्चासह रद्द होत आहे.

9) वादीचे दाव्यास मुदतीचे कायद्याचा बाध येत असल्याने देखील वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

10) वादी यांना कोणत्याही प्रकारची प्रायमाफेस केस नव्हती व नाही. तसेच न्यायाचा समतोल हा प्रतिवादीचे बाजूने कालही होता व आजही आहे. अश्या परिस्थिती मध्ये वादीस प्रतिवादी विरुध्द मनाई हुकुम मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त झालेला नव्हता व नाही व होणारही नाही. याही कारणास्तव सदरचा दावा व मनाई अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

11) वादींनी दावा कलम १ मध्ये जे मिळकतीचे वर्णन दिलेले आहे. ते खरे नाही कायदेशीर नाही त्यामुळे दावा मिळकत ही अॅडेन्टीफाय होवू शकत नाही. त्यामुळे वादीचा दावा व मनाई हुकुमाचे अर्जास सि.पी.सी. ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याकारणाने वादीचा दावा समरली रद्द होण्यास पात्र आहे.

12) वादींनी सदरच्या दाव्यात योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही व मिळकतीचे मुल्यांकन हे बेकायदेशीररित्या करुन प्रचलित कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार व योग्य त्या बाजारभावाप्रमाणे योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. याही कारणास्तव सदरचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. याच मुद्यावर प्रथम चौकशी होवून सदरचा दावा रद्द करण्यात यावा.

13) दावा कलम २ मधील कथन की, " सदरची दावा मिळकत ही प्रतिवादी नं१. चे वडिल आणि प्रतिवादी नं२. चे पती सिताराम आसराजी झिने यांना शासना मार्फत कायमस्वरुपी देण्यात आलेली होती व आ हे. त्यासाठी सदर सिताराम आसराजी झिने यांनी सदर दावा मिळकतीची कब्जा हक्काची रक्कम १२१८/- रुपये तसेच मोजणी फी ३००/- रुपये शासनाकडे ता.०३/०९/२००२ रोजी भरलेली होती व आहे. त्यानंतर पुढे तशी कायदेशीर नोंद तहसिलदार नेवासा यांच्याकडे आदेश क्रं. एस/आर/४०/२००२ अन्वंये फेरफार नं. ९३४१ ने सदर दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर

कायदेशीररित्या करण्यात आलेली होती व आहे. आणि त्या अनुषंगाने पुढे सदर दाव्याच्या मिळकतीचा प्रत्यक्ष शासनाने सदर प्रतिवादी नं.१ चे वडिल आणि प्रतिवादी नं.२ चे पती सिताराम आसराजी झिने यांना त.१६/०१/२००३ रोजी दिलेला होता व आहे. याप्रमाणे दावा मिळकत ही सिताराम आसराजी झिने यांच्या कायदेशीर मालकी कब्जाची होती. " हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

14) दावा कलम ३ मधील कथन की, " सदर प्रतिवादी नं.१ चे वडिल आणि प्रतिवादी नं.२ चे पती सिताराम आसराजी झिने हे ता.२१/०५/२००३ रोजी उस्थळ दुमाला (नविन चांदगांव) येथे मयत झाले. त्यानंतर पुढे सदर प्रतिवादी यांची मयत सिताराम आसराजी झिने यांचे हिंदू कायद्याप्रमाणे वारस म्हणुन नोंद रेव्हेन्यु रेकॉर्डला/महसुल दप्तरी फेरफार नं. ९४७४ ने झालेली होती व आहे आणि याप्रमाणे सदर दावा मिळकत ही वारस हक्काने प्रतिवादी नं.१ व २ यांच्या नावावर ७/१२ सदरी रेव्हेन्यु रेकॉर्डला कायदेशीररित्या झालेली होती व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

ASSISTANT ... Criminal ...

15) दावा कलम ४ मधील कथन की, “ सदर प्रतिवादी आणि वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांचे अत्यंत प्रेमाचे, लोभाचे आणि घरोब्याचे आणि जिव्हाळयाचे संबंध होते व आहे. आणि वादीच्या वडिलांनी सदर प्रतिवादींना त्यांच्या सर्व कामात सहकार्य आणि मदत देखित केलेली होती व आहे. तसेच सदरची दावा मिळकत वादीच्या वडिलांना प्रतिवादी यांनी वहिवाटीस दिलेली होती व आहे. आणि याप्रमाणे दाव्याची जमिन ही वादीच्या वडिलांच्या ताब्यातच/कब्ज्यात होती व आहे. याप्रमाणे वादीच्या वडिलांचा आणि प्रतिवादींचा एकमेकांवर भरोसा आणि विश्वास होता व आहे. ” हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

16) दावा कलम ५ मधील कथन की, “ याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे वस्तुस्थिती असतांना सदर प्रतिवादींना सदर दाव्याची मिळकत त्यांच्या वहिवाटीसाठी गैरसोयीची असल्यामुळे तसेच दाव्याच्या जमिनीतुन प्रतिवादींना हवे तसे उत्पन्न निघत नसल्यामुळे सदर जमिन प्रतिवादींनी कायमस्वरुपी विक्रीस काढली, आणि त्याबाबत सदर प्रतिवादींनी वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांना अशी विनंती केली की, आपले संबंध घरोब्याचे आहेत आणि आपला एकमेकांवर विश्वास आहे त्यामुळे सरची जमिन इतर लोकांना खरेदी देण्याऐवजी तुम्हीच खरेदीखत करुन घ्या आणि

त्यामुळे प्रतिवादींच्या विनंतीला मान देवुन वादीच्या वडिलांनी वादीच्या नावे सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करुन घेण्याचे प्रतिवादींच्या इच्छेप्रमाणे कबुल केलेले होते व अहे." हा संपूर्ण मजकूर वादींनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

17) दावा कलम ६ मधील कथन की, " त्यानंतर सदर दावा मिळकत हो शासनामार्फत मिळालेली असल्यामुळे सदर दावा मिळकतीचे ७/१२ सदरी इतर हक्कात पुनर्वसन नविन शर्त अशी नोंद देखील फेरफार नं. ९३४१ ने झालेली होती व आहे. त्यामुळे सदर दाव्याचे जमिनीच्या रजिस्टर खरेदीखतासाठी सक्षम महसुल अधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेणे आवश्य होते व आहे .आणि सदरची परवानगी आणण्यासाठी प्रतिवादीने वादीच्या मयत वडिलांना जनरल मुख्त्यारपत्र देखील ता.०६/१०/२००८ रोजी करुन दिलेले होते व आहे. आणि याप्रमाणे सदर दाव्याच्या मिळकती पुर्व परवानगी आणण्याची जबाबदार वादीचे मयत वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांना प्रतिवादींनी त्यांचे स्वईच्छेने दिलेली होती व आहे. सदरचे ता.०६/१०/२००८ चे जनरल मुख्त्यारपत्र वादी या दाव्यामध्ये या माननीय कोर्टाच्या अवलोकनासाठी दाव्यासोबत दाखल करीत आहे. सदरचे जनरल मुख्त्यारपत्र या दाव्याचा आणि मनाई हुकुमाच्या अर्जाचा पार्ट आणि पार्सल /अंग आणि भाग समजण्यात यावा आणि पुराव्यात वाचण्यात यावा अशी या वादीची या माननीय

कोर्टाला नम्रतेची खिनंती आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकल्पीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

18) दावा कलम ७ मधील कथन की, " याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे वस्तुस्थिती असतांना ता.०६/१०/२००८ सदर दावा मिळकत वादीला खरेदी देण्यासाठी सदर प्रतिवादी यांनी १००/- रुपयाच्या स्टॅम्पवर खरेदी करारनामा नोटरी श्री पी.एस.वाखुरे वकिल साहेब यांच्याकडे कायदेशीररित्या करुन दिलेला होता व आहे आणि त्यासाठी १००/- रुपयाचा स्टॅम्प प्रतिवादी नं.१ ने त्याच्या स्वत:च्या नावावर आणलेला होता व आहे. आणि त्याप्रमाणे प्रतिवादींनी सांगितल्याप्रमाणे सदरच्या १००/- रुपयाच्या स्टॅम्पवर प्रतिवादींनी वादीला दावा मिळकती बाबत खरेदी करारनामा त्यांच्या स्वइच्छेने करुन दिलेला होता व आहे. सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मधील संपूर्ण मजकूर प्रतिवादी यांनी सांगितल्याप्रमाणे टाईप करण्यात आलेला होता व आहे. आणि सदरचा मजकुर टाईप झाल्यानंतर सदरच्या खरेदी करारनाम्यावर वादी आणि प्रतिवादी नं.१ याने सदर नोटरी पब्लीक श्री पी.एस.वाखुरे यांच्या समक्ष सह्या केलेल्या होत्या आणि प्रतिवादी नं.२ हिने देखील नोटरी पब्लिक श्री पी.एस.वाखुरे वकिल यांच्या समक्ष सदर खरेदी करारनाम्यावर तीच्या स्वत:चा अंगठा केला होता आणि तसेच साक्षीदाराने देखील सदरच्या नोटरी खरेदी करारनाम्यावर त्यांच्या सह्या नोटरी पब्लिक यांच्या समक्ष केलेल्या होत्या व आहे. तसेच सदरच्या कायदेशीर

खरेदी करारनाम्यावर वादी आणि प्रतिवादी यांचे फोटो देखिल लावण्यात आलेले होते व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

19) दावा कलम ८ मधील कथन की, " सदरच्या ता.०६/१०/२००८ च्या नोटराईज खरेदी करारनाम्या मधील रिसायटल अन्वये दावा मिळकतीची खरेदी किंमत २,००,०००/- (दोन लाख रुपये मात्र) रुपये अशी टरलेली होती व आहे. आणि सदरची दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/- वादीने प्रतिवादींना ता.०६/१०/२००८ रोजीच साक्षिदारांसमक्ष रोख दिलेले होते व आहे. तसेच सदरचे २,००,०००/- रुपये वादी नं.१ चे वडिल, भाऊ आणि वादी नं.१ यांच्या एकत्र अविभक्त हिंदू कुटुंबाच्या पैश्यातुन आणि उत्पन्नातुन त्यांच्या एकत्र हिंदू कुटुंबासाठी दिलेले होते व आहेत. आणि सदर दावा मिळकतीची रजिस्टर खरेदीखताची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/-रोख मिळाल्याबाबत प्रतिवादींनी सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये लिहून दिलेले होते व आहे. आणि तसे रिसायटल देखील सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या अन्वंये प्रतिवादींनी वादींच्या वडिलांना दिली होती आणि त्याप्रमाणे वर वर्णन केल्याप्रमाणे प्रतिवादींनी वादींच्या वडिलांना सदर पुर्व परवानगी आणण्यासाठी स्वतंत्र नोटराईज जनरल मुख्त्यारपत्र देखिल करुन दिलेले होते व आहे. त्याबाबत देखिल सुस्पष्ट

रिसायटल सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये होते व आहे. एवढेच नव्हतेर सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये प्रतिवादींनी सदर दावा मिळकतीचे पुर्व परवानगी अणल्यानंतर वादीच्या वडिलांनीच दुय्यम निबंधक कार्यालय नेवासा येथे रजिस्टर खरेदीखत करुन द्यावे असे अधिकार देखिल सदरच्या नोटराईज खरेदी करारनाम्या मध्ये प्रतिवादींनी वादीच्या वडिलांना दिलेले होते व आहे. याप्रमाणे प्रतिवादी यांनी सदर वादीस ता.०६/१०/२००८ रोजी कायदेशीर नोटराईज खरेदी करारनामा करुन दिलेला होता व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

25/8/24
Court Newasa

20) दावा कलम ९ मधील कथन की, " त्यानंतर पुढे सदर दावा मिळकतीचे सक्षम महसुल अधिकाऱ्यांकडुन परवागनी आणण्यासाठी प्रतिवादी यांनी लेखी अर्ज उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांच्याकडे दिला होता आणि त्या अर्जा अन्वंये प्रतिवादी यांनी वादी नं.२ (वादी नं.१ ची पत्नी) श्रीमती वनिता दत्तात्रय कुऱ्हाट हिला दावा मिळकत खरेदी देण्यासाठी सदर अर्जाअन्वंये रेव्हेन्यु अधिकारी साहेब यांना विनंती केलेली होती. त्यामुळे त्याबाबत संबंधीत रेव्हेन्यु अधिकाऱ्यांनी कायदेशीर चौकशी करुन सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्यासाठी कायदेशीर परमिशन ता.१३/०६/२०२४ रोजी दिलेली होती व आहे. आणि सदरच्या दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी सदर दावा

मिळकतीचे बागायत मुल्यांकन ८४,२६०/- (चौऱ्यांशी हजार दोनशे साठ रुपये फक्त) एवढी नजराणा रक्कम चलनाने शासनाकडे जमा करण्याबाबत हुकुम ता.१३/०६/२०२४ रोजी केलेला होता व आहे आणि सदर उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांनी ता.१३/०६/२०२४ रोजी सदर दाव्याच्या मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखतास जी परवानगी दिली आहे त्या पत्राची अस्सल प्रत वादी हे या दाव्यासोबत या माननीय कोर्टाच्या अवलोकनासाठी दाखल करीत आहे. सदर दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखतासाठी जी परवानगी देण्यात आलेली आहे त्या पत्राची आणि ऑर्डरची प्रत या दाव्याच्या आणि मनाई हुकुमाच्या अर्जाचा पार्ट आणि पार्सल/अंग आणि भाग समजण्यात यावे आणि पुराव्यात वाचण्यात यावे अशी या वादीची या माननीय कोर्टाला नम्रतेची विनंती आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

21) दावा कलम १० मधील कथन की, " सदर दाव्यातील वादी नं.२ हिच्या नावाने दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताच्या पुर्व परवानगीचा अर्ज प्रतिवादींनी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अहमदनगर यांच्याकडे दिलेला होता आणि वादी नं.२ हिच्या नावानेच सदर दावा मिळकतीच्या खरेदीखताचे पुर्व परवानगी देण्यात आलेली असल्यामुळे तीला या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन तसेच दाव्यामध्ये कोणताही तांत्रिक दोष राहु नये म्हणुन वादी नं.२ म्हणुन समाविष्ट केलेले आहे. आणि त्यामुळेच सदरचे सुस्पष्ट प्लिडिंग

वादींनी या दाव्यामध्ये ॲबंडंट प्रीकॉशनने केलेले आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

22) दावा कलम ११ मधील कथन की, " याप्रमाणे वरील संपूर्ण परिस्थिती असतांना आणि ता .१३/०६/२०२४ रोजी सदर दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी कायदेशीर पुर्व परवानगी मिळाल्यानंतर वादीने प्रतिवादींना स्वत: साक्षीदार सह प्रत्यक्ष भेटुन सदर दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास वारंवार विनंत्या केल्या, एवढेच नव्हेतर सदर दावा मिळकतीच्या रजिस्टर खरेदीखताची चलनाने सदर दावा मिळकतीच्या बागायत मुल्यांकनाच्या ५०% रक्कम ८४,२६०/- रुपये वादी भरण्यास तयार होता व आहे. आणि ताबडतोब सदर रक्कम वादी चलनाने भरण्यास तयार आहे तरी तुम्ही दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन द्या अशी विनंती वादीने प्रतिवादी यांना प्रत्यक्ष भेटुन ०१/०१/२०२५ रोजी स्वत: साक्षिदारां समक्ष केली, परंतू प्रतिवादी यांनी देवुदिलावु करुन सदर दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास पध्दतशीरपणे टाळाटाळ केली आणि करीत आहे. त्यामुळे शेवटी नाईलाजास्तव वादीने प्रतिवादी नं.१ व २ यांना वादीच्या वकिला मार्फत कायदेशीर रजिस्टर नोटिस ता.२०/०१/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने दिली, सदरची नोटिस प्रतिवादींना ता.०४/०२/२०२५ रोजीच मिळालेली आहे, परंतू त्याबाबतच्या पोहोच पावत्या आज पर्यंत वादीला मिळु नये असे

प्रयत्न प्रतिवादींनी सुरु केल्याचे वादीला समजल्या बरोबर वादीने त्याबाबत ट्रॅक रिपोर्ट काढला आणि त्या ट्रक रिपोर्टवरुन हे स्पष्ट झाले की, सदर नोटिस प्रतिवादींना ता.०४/०२/२०२५ रोजी मिळालेली आहे. सदर ट्रॅक रिपोर्टची प्रत वादी या दाव्यासोबत दाखल करीत आहे. सदर ट्रॅक रिपोर्टची प्रत देखील या दाव्याचे आणि मनाई हुकुमाचे अर्जाचे पार्ट आणि पार्सल समजण्यात यावे आणि पुराव्यात वाचण्यात यावे अशी देखील या वादीची या माननिय कोर्टाला नम्रतेची विनंती आहे. सदर नोटिशीला प्रतिवादी यांनी मुद्दाम गैरसल्याने आणि गैरहेतुने उत्तर दिलेले नाही." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

23) दावा कलम १२ मधील कथन की, " याप्रमाणे वादीने प्रतिवादींना कायदेशीररित्या पाठविलेले रजिस्टर नोटिस मिळाल्यानंतर देखील प्रतिवादींनी वादिला दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन दिलेले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव वादींना प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

24) दावा कलम १३ मधील कथन की, " सदर वादींनी दावा मिळकतीची खरेदीची संपूर्ण रक्कम प्रतिवादींना खरेदी करारनाम्यावरच वर

वर्णन केल्याप्रमाणे ता.०६/१०/२००८ रोजी रोख दिलेले आहे. तसेच वादी हे दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन घेण्यास नेहमीच रेडी आणि विलींग (तयार होते व आहेत) होते व आहे. एवढेच नव्हेतर सदर दावा मिळकतीच्या खरेदीखतासाठी जे ५०% मुल्यांकन शासकीय ट्रेझरी मध्ये भरण्याची जबाबदारी प्रतिवादीची असतांना देखील आणि ती रक्कम रुपये ८४,२६०/- प्रतिवादी मुद्दाम शासकिय ट्रेझरी मध्ये भरत नाहीत असे असतांना देखिल सदरचे ८४२६०/- रुपये देखील वादी शासकिय ट्रेझरी मध्ये भरण्यास तयार आहेत. तरी देखिल प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन देण्यास जाणीवपुर्वक आणि गैरसल्याने आणि गैरहेतुने आणि गैरउद्देशाने मुद्दाम टाळाटाळ करीत होते व आहे. त्यामुळे देखिल सदरचा दावा हा वादींनी त्वरीत दाखल केलेला आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

25) दावा कलम १४ मधील कथन की, " सदर दाव्याच्या जमिनी मध्ये वादी हा गेल्या १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन स्वत: मालकी हक्काने कब्जा करुन पिके उत्पन्न उपभोग घेत होता व आहे. यावर्षी देखील वादीने सदर दाव्याच्या जमिनीमध्ये ४९६ जातीचे गव्हाचे पिक केलेले होते व आहे आणि सदरच्या गव्हाचे पीकाचे फळे वादींनी हार्वेस्टर मशिन मार्फत ता.२५/०३/२०२५ रोजी केलेले आहे आणि आता दावा मिळकत वादींनी नांगरुन मेहनत, मशागत करुन पुढील पिक घेण्यासाठी तयार केलेली आहेत. याप्रमाणे दावा

मिळकतीवर वादींचा कायदेशीर प्रत्यक्ष कब्जा होता व आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

26) दावा कलम १५ मधील कथन की, " वादींना असे नुकतेच खात्रीलायकरित्या समजले आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकतीचे तिऱ्हाइत इसमांना बेकायदेशीर हस्तांतर करणार आहेत आणि निष्कारण मल्टीप्लीसीटी ऑफ लिटिगेशन आणि प्रोसेडिंग करणार आहे, त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द रजिस्टर खरेदीखत मिळण्यासाठी आणि हस्तांतराच्या मनाई हुकुम मिळण्यासाठी देखील सदरचा दावा वादींनी कोणतीही वेळ न घालविता वादी त्वरीत या माननीय कोर्टात दाखल करीत आहे." हा संपूर्ण मजकूर वादीनी खोटा व कपोलकलपीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

27) दावा कलम १६ मधील कथन की, " वादींना उत्कृष्ट अशी प्रथमदर्शनी केस आहे, कारण दावा मिळकतीचे प्रतिवादीने वादी नं१ याला कायदेशीर नोटराईज खरेदी करारनामा करुन दिलेला आहे आणि दावा मिळकतीच्या खरेदीची संपूर्ण रक्कम रुपये २,००,०००/- प्रतिवादींनी ता.०६/१०/२००८ रोजीच वादी कडुन साक्षीदारां समक्ष रोख घेतलेली आहे. तसेच न्यायाचा समतोल देखील वादीच्याच बाजुने होता व आहे. कारण दावा मिळकत वादींच्या प्रत्यक्ष

कब्जात गेल्या १५ वर्षांपेक्षा जास्त काळापासून होती व आहे आणि त्याबाबत वादी हे गट. नं. वरील मिळकत येत होते व आहेत अश्या परिस्थिती मध्ये सदर प्रतिवादींना हस्तांतराच्या मनाई हुकुम दिल्यास गेल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाहील परंतु प्रतिवादींना हस्तांतराच्या मनाई हुकुम न दिला गेल्यास सदर प्रतिवादी हे जाणीवपूर्वक मल्टीप्लीसीटी ऑफ लिटिगेशन आणि प्रोसेडिंग करतील आणि त्यामुळे वादीचे कधीही न भरून येणारे असे अपरमीत नुकसान होणार आहे, झाले आणि होत आहे ."
हा संपूर्ण मजकूर वादींनी खोटा व कपोलकल्पीत असा लिहून मे.कोर्टाची खोटी सहानुभुती मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो या प्रतिवादी यांना मान्य नाही कबूल नाही. वादीने ते सक्तरितिने शाबीत करावे.

28) दावा कलम १७ मध्ये दाखविलेले दाव्यास कारण ते खोटे व काल्पनिक असे दाखविलेले आहे दाव्यास कोणतेही रास्त कारण घडलेले नसतांनाही खोटे कारण देवून सदरचा दावा दाखल केलेला आहे. सबब वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही. दावा व मनाई हुकुमाचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

29) वादीने दावा कलम १९ मध्ये जो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला आहे. तो योग्य त्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे लावलेला नसल्याने कारणाने वादींचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

30) वादीचे दावा कलम २१ मधील वादीने ज्या विनंत्या या न्यायालयापासून मागितलेल्या आहेत त्या खोट्या अश्या आहेत सबब वादींच्या सर्व विनंत्या फेटाळून लावण्यात याव्यात हि विनंती अश्या प्रकारची मागणी वादीस करता येत नाही सबब वादीचा दावा रद्द करण्यात यावा.

31) वादीस सकृतदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल प्रतिवादीचे बाजूने आहे. मनाई दिल्यास प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही हे खरे नाही. व मनाई हुकुम न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. हे खरे नाही. मनाई न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याचे कारण नाही. वादीचा मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

32) **वस्तुस्थिती अशी आहे की,** सदर मिळकत ही प्रतिवादी नं.१ चे वडिलांना भुमिहिन शेत मजुर म्हणुन मिळालेली होती व आहे. प्रतिवादी नं.१ चे वडिल मयत झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ यांचे नांवे वारस म्हणुन सदर मिळकतीस लागलेली आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी हरजिनसी उत्पन्न उपभोग घेत होते व आहेत. वादी नं.१ चे वडिल नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी यांच्या लगत असलेल्या गट नंबर १८२ मधील इतर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी विकत घेण्याचे ठरविले व त्यांना दुसरी कडे सोईच्या अश्या जमिनी घेवुन देण्याचे ठरविल्याने सर्व लगतच्या शेतकऱ्यांनी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांचेवर विश्वास ठेवुन त्यांच्या जमिनी विक्री करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ व २ यांनी सुध्दा सदर दावा मिळकत ही नारायण कुऱ्हाट यांना विक्री करण्याचे ठरविले त्याप्रमाणे दि.६ ऑक्टोंबर २००८ रोजी वादी नं.१ चे लाभात नारायण कुऱ्हाट यांनी प्रतिवादी कडुन खरेदी करारनामा लिहून घेतला व त्याचदिवशी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी नं.१ व २ यांचेकडुन गट नंबर १८२/१ क्षेत्र ० हे ४४ आर आकार ० रु. २५ पैसे या मिळकती संदर्भात अदलाबदल करण्याकरीता जनरल मुख्त्यार लिहून घेतले. तद्नंतर नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी कुठल्याही प्रकारचे प्रतिवादी नं.१ व २ यांना अदलाबदल करण्याबाबत तसेच प्रतिवादी नं.१ व २ यांना दुसरे क्षेत्र दाखविले नाही अगर घेवुन दिलेले नाही.

Assistant Criminal

33) प्रतिवादी नं.१ व २ यांनी वेळोवेळी नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांची भेट घेवून दिनांक ६ ऑक्टोबर २००८ रोजी तुम्ही आमच्या कडून बिन भरण्याचा खरेदी करारनामा दत्तात्रय नारायण कुऱ्हाट यांचे नावाने लिहून घेतलेला आहे. त्याबदल्यात आम्हाला तुम्ही दुसरीकडे सोईस्करअशी जमिन घेवुन देणार आहात ती जमिन आम्हास कधी घेवुन देणार याबाबत विचारणा करण्यास गेले असता सध्या इतर शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यामुळे माझी आर्थिक अडचण आहे, तुम्ही आमच्या जवळचे आहात, माझ्यावर भरवसा ठेवा मी तुम्हाला फसविणार नाही असे बोलुन वेळकाढुपणा करत होते. परंतू नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट यांनी प्रतिवादी नं.१ व २ यांना प्रत्यक्ष ठरल्याप्रमाणे अदलाबदल करण्याच्या बदल्यात दुसरी जमिन आजतागायत बघितलेली नाही व देतही नाही. अश्या कारणामुळे प्रतिवादी नं.१ व २ यांची वादी नं.१ व त्यांचे वडिलांनी फसवणुक केलेली आहे.

Superintendent Court Newase

34) सन २०२०-२०२१ च्या काळात नारायण पंढरीनाथ कुऱ्हाट हे मयत झालेले आहेत ही बाब वादी यांनी लपवुन ठेवलेली आहे. यावरुन असे सिध्द होते की, वादी यांनी एकमिलाफी होवुन प्रतिवादीकडुन खोट्या कथनांचा आधार घेवुन व खोट्या नोटरी दस्त्ऐवजावरुन बेकायदेशीर खरेदीतखत करुन मिळण्याकामी प्रस्तृतचा दावा दाखल केलेला आहे. वादी नं.२ ही कोणत्या कागदपत्रांचे आधारे वादीपणात सामिल झाली याचा बोध होत नाही याही कारणास्तव वादीचे दाव्यास मिस जॉईडर ऑफ नेसेसरीज पार्टीजचा बाध येत आहे. तसेच वादी यांनी खोट्या खरेदी करारनाम्याअन्वंये खरेदीखत करुन मागणी चालविलेली आहे त्यास मुदतीचे कायद्याची बाधा येत असल्याने सदर मुदतीच्या कायद्याचा प्राथमिक मुद्दा काढुन सदरचा दावा रद्द करण्यात यावा.

35) वादी यांनी प्रतिवादी यांना जी नोटिस पाठविलेली आहे. ती नोटिस खोटी व खोटा पुरावा निर्माण करण्याकरीता पाठविलेली आहे. त्याआधारे सदरच्या

तथाकथीत खोट्या करारनाम्याअन्वंये प्रतिवादींकडुन बेकायदेशीर खरेदीखत नोंदविण्याची मागणी चालविलेली आहे ती खोटी व लबाडीची आहेत कारण वादींनी प्रतिवादींना पाठविलेली प्रतिवादीकरीताची नोटि्स ही मुदत संपल्यानंतर प्रतिवादींना भेटलेली आहे त्यामुळे प्रतिवादीविरुध्द वादींना कोणत्याही प्रकारचे नोटिसीद्वारे अगर कुठल्याही दिवाणी दाव्याची कारवाई होईल कल्पना नव्हती व नाही.

36) वास्तविक वादींनी प्रतिवादी यांना नेवासा सब रजि. ऑफिस मध्ये दिनांक ०३/०२/२०२५ रोजी हजर राहण्याबाबतची जी तथाकथीत खोटी नोटिस दिलेली होती ती नोटिस प्रतिवादींना दिनांक ४/२/२०२५ रोजी प्रतिवादींना मिळाली म्हणजे वादींनी प्रतिवादी यांना जाणीवपुर्वक हेतुपुरस्करपणे नोटिस मिळणार नाही मुदतीत ते तेथे येणार नाही या गैरउद्देशाने प्रेरीत होवुन स्वत:च्या फायद्याकरीता खोटे कथने करुन नोटिस पाठविली होती ही बाब वादींना माहिती होती व आहे. यावरुन असे सिध्द होते की, वादी यांनी प्रतिवादींना ठरल्याप्रमाणे अदलाबदल करण्याकरीता दुसरी सोईस्कर जमिन दिलेली नाही, देत नाही केवळ फुकटात प्रतिवादींची जमिन लाटण्यासाठी खोट्या मजकुराचा दावा प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे.

37) प्रतिवादी यांना वादीं नं.१ ने कोणताही मोबदला दिलेला नाही केवळ खरेदी करारनाम्याला दोन लाख रुपये दिल्याचे दाखविलेले आहे ते खोटे आहे. प्रतिवादी यांना कोणताही मोबदला मिळालेला नाही. कारण प्रतिवादी नं.१ चे वडिलांनी अदलाबदल करण्याकरीता सदरचे दस्तऐवज बनविलेला आहे त्यामुळे दस्ताआधारे वादीं नं.१ ला खरेदीखत करुन मागता येणार नाही. इतर लगत कब्जेधारकांच्या जमिनी घेवुन त्यांना इतर ठिकाणी जमिनी घेवुन दिलेल्या आहेत. केवळ प्रतिवादी यांना पर्यायी जमिन घेवुन दिलेली नाही. त्यामुळे वादी

यांचेशी झालेल्या करारनाम्याचा भंग झालेला असल्याने तो रद्द बातल झालेला आहे. त्यामुळे त्या बोगस खरेदी करारनाम्याचा आधार घेवुन वादींना या प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल करुन खरेदीखत करुन मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार राहिलेला नव्हता व नाही.

38) वादीचे दाव्यातील कथने बधितली असता तसेच दाव्यास दिलेले कारण बधितले असता वादी नं.१ ने स्वत: करारभंग केलेला दिसुन येतो. त्यामुळे वादीचा दावा कायद्याने चालू शकत नाही.

39) वरील सर्व कारणाचा विचार होऊन वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह रद्द व्हावा.

40) विनाकारण दावा करुन खर्चात पाडल्याने या प्रतिवादीं नं.१ व २ यांना वादीकडुन प्रत्येकी कॉम्पेंसेंटरी कॉस्ट रु. २०,०००/- व पिनल कॉस्ट रु. २०,०००/- देण्याचा हुकुम व्हावा. या दाव्याचा संपूर्ण खर्च वादीकडून देववावा.

41) **तरी प्रतिवादीची विनंती की,**

a. वादी यांचा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

b. इतर योग्य त्या न्यायाच्या दादी प्रतिवादी यांचे लाभात व्हावेत.

c. वेळप्रसंगी जादा कैफियत देण्याची व कैफियत दुरुस्त करण्याची परवानगी असावी.

**येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट दिले असे.**

**नेवासा**

**दिनांक:-२१/०८/२०२५**

ॲफिडेव्हिट करणार

ओळख

(ॲड.बी.जी.झावरे)

या कामी श्री भाऊसाहेब सिताराम झिने वय-६०, धंदा-शेतमजुर रा.उस्थळ दुमाला ता.नेवासा जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमुद ॲफिडेव्हिट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आज रोजी या लेखाखाली मी माझी सही केली असे.

नेवासा

दिनांक:-२१.०८.२०२५

ॲफिडेव्हिट करणार

1 2 8921

Bhausaheb Sitaram Zine Age 60 occ Agri labor

Adv B.G. Zaware R/o Ustal Dumala

Newasa

Asstt. Superintendent

Criminal Court Newase